I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 301-303
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# लॉकडाऊननंतर भारतापुढील सामाजिक आव्हाने

R. Rathod
Shri. Vasantrao Naik Mahavidyalaya Dharni.
*Corresponding Author: rathdramesh11@gmail.com

**ABSTRACT:**

**Key words:** .

**प्रस्तावना –**

आज संपूर्ण विश्वात कोरोणा विषाणूचा प्रादुर्भाव पसरलेला आहे. भारतात जवळ जवळ चार लाखांपेक्षा जास्त लोक कोरोणा विषाणुमुळे संक्रमित झालेले आहे तर जगात लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. संपूर्ण विश्वाने एक नवा अनुभव घेतला तो म्हणजे लॉकडाऊनचा. लॉकडाऊनच्या काळात भारतामध्ये देखील कोरोणा संस्कृती विकसीत होऊन तिला अंगीकारण्याचे फार मोठे आव्हान लॉकडाऊन नंतर भारतापुढे उभे झालेले आहे. या सोबतच विविध सामाजिक बदल देशात घडून आलेले आहे. आपले दैनंदिन व्यवहार सुरू ठेवावेच लागेल अशा वेळी कोरोणाशी सामना करताना समाजाला आणि राष्ट्राला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल. सरकारने चार वेळा लॉकडाऊन केले आणि कोरोणाला नियंत्रीत करण्याचे प्रयत्न केले. परंतु कोरोणा संपला नाही. शेवटी सरकारला अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी अनलॉक करणे भाग पडले आणि जगात स्वतला सर्वात स्वतंत्र समजणारा माणूस लॉकडाऊन आणि अनलॉकच्या बंधनात सापडला. कोरोणा विषाणूमुळे भारतापुढे अनेक सामाजिक आव्हाने उभी राहली आहे. याचा उहापोह होणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1. कोव्हीड–19 मुळे भारतापुढे निर्माण झालेल्या आव्हानांचा शोध घेणे.

2. कोव्हीड–19 मुळे मानवी जीवनात आलेल्या बदलांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके –**

1. कोव्हीड–19 मुळे संपूर्ण मानवी जीवन प्रभावित झाले आहे.

2. कोव्हीड–19 मुळे भारतापुढे अनेक नवीन आव्हाने उभी झाली आहे.

**लॉकडाऊननंतर भारतापुढील सामाजिक आव्हाने**

**१) कोरोणा संस्कृती –**

लॉकडाऊन दरम्यान आणि नंतर भारतातील नाहीतर संपूर्ण जगातील सरकार समोर पर्यायाने जनतेसमोर उभे असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे कोरोणा संस्कृती होय. कोरोणा संस्कृती म्हणजे माणसाला कोरोणाने काही गोष्टी करण्यास भाग पाडले आहे. यामध्ये सोशल डिस्टंसींग, मास्क, कोरान्टाईन, आरोग्य सेतू ॲप, लॉकडाऊन रूल, अनलॉक रूल, कन्टेन्टमेंट झोन आत्मनिर्भरता इत्यादी गोष्टी माणसाला जीवन

जगतांना समजून घेणे व त्याप्रमाणे जगणे आवश्यक झाले आहे. एकप्रकारे या गोष्टी मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहे त्यामुळे कोरोणा संस्कृती नावाच्या एका नवीन आव्हानाला समाजाला सामोरे जावे लागत आहे.

**२) आत्मनिर्भरता –**

कोरोणामुळे लोकांचे जीवन प्रभावित झाले आहे. उद्योगधंदे, रोजगार, देशाची आर्थिक स्थिती या सर्वांवर त्याचा परिणाम झालेला आहे. अशा परिस्थितीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण भारतातील नागरिकांना आव्हान केले की, कोरोणाशी लढतांना भारताला आत्मनिर्भर व्हावे लागेल. म्हणजेच भारताने इतर देशातील निर्मितीवर अवलंबून राहता कामा नये आणि चीनवर मुळीच नाही त्यामुळे भारतातील नागरिकांनाही आत्मनिर्भरता अंगीकारावी लागेल. आपल्याला अवलंबून राहण्याच्या प्रवृत्तीला बदलावे लागेल. आत्मनिर्भरता ही बाब भारताकरिता नवीन नाही. कारण महात्मा गांधीजींनी आपल्या ग्रामस्वराज्य संकल्पनेमध्ये आत्मनिर्भरता स्पष्टपणे मांडली आहे. आता आवश्यकता आहे ती अंगीकारण्याची. सर्व काही ऑनलाईन, रेडिमेट किंवा ऑन डोअर प्राप्त करणाऱ्यांना आता बदलावे लागेल.

**३) कर्मचाऱ्यांचे आरोग्य –**

कोरोणा महामारीच्या काळात डॉक्टर, नर्स, पोलीस आणि संरक्षण व्यवस्था यांची सेवा गौरवान्वीत करण्यासारखी आहे. हे देशाचे खरे सैनिक आहे जे कोरोणाशी सतत लढा देत आहे. आजही परिस्थिती नियंत्रणात आली नसल्यामुळे आरोग्य कर्मचारी, संरक्षण व्यवस्था यांच्यावर ताण वाढत आहे. अशा वेळी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांशी आणि पोलीस यंत्रणा हे कोरोणा फायटरर आहे. अशावेळी त्यांची अधिक भर्ती करणे, त्यांना पुरेसे वेतन देणे आणि जनतेच्या सेवेकरिता त्यांना सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. कारण असे म्हणतात, ज्याप्रमाणे पैशाचे सोंग आणता येत नाही त्याचप्रमाणे डॉक्टर कमी पडले तर डॉक्टरांचे सोंग आणता येत नाही. कोरोणा संक्रमण झाले त्यांची वाढती संख्या पाहता हे मोठे आव्हान भारतापुढे आहे.

**४) परिस्थितीची सवय आणि शिस्त –**

सरकारने लॉकडाऊनमधून सुट दिली आणि ऑनलॉक झाल्या लोकांनी गर्दी केली. जणू काही झालेच नाही. परंतु अशा पद्धतीने पूर्णता बिनधास्त आता कुणालाच राहता येणार नाही. दरदिवशी हजारोंनी कोरोना बाधीत रुग्ण निघत असतांना लोकांना कोरोणाजन्य परिस्थितीशी जीवन जगतांना स्वतला नीट सवय आणि शिस्त लावावी लागेल. सामाजिक अंतर कायम ठेवून यात्रा महोत्सव, लोकांचे सन, आनंद उत्सव, धार्मिक महोत्सव इत्यादींना काही काळाकरिता टाळावे लागेल. जनतेला आत्मनिर्भर व्हावे लागेल. संयम ठेवावा लागले, काही बाबतीत आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करावा लागेल.

**५) बेरोजगारी –**

लॉकडाऊनमुळे सर्वात मोठे आव्हान भारतापुढे उभे झाले ते म्हणजे बेरोजगारी. अनेक मजूर आपले काम सोडून आपल्या गावी परत गेले. गावात काम

नसल्यामुळे त्यांच्यापुढे रोजगाराचे संकट उभे झाले. आधीच बेरोजगारांची संख्या असतांना त्यात आणखी भर पडली. अशावेळी देशासमोर मोठे आव्हान आहे ते श्रमीकांच्या हाताला काम उपलब्ध करून देणे, त्यांना रोजगार देणे, जेणेकरून गुन्हेगारीचे प्रमाण आणखी वाढणार नाही. कारण अनेक महामारीचा इतिहास उघडला तर गुन्हेगारीच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ झालेली दिसून येते.

**६) अर्थव्यवस्था –**

भारताची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणणे हे सर्वात मोठे आव्हान भारतापुढे आहे. गेली तीन महिने रेल्वे, विमानसेवा, उद्योगधंदे, दळणवळण आणि इतर सुविधा देणारे अनेक विभाग बंद असल्यामुळे निश्चितच देशाची अर्थव्यवस्था ही कोलमडली आहे. अशावेळी ती पूर्वपदावर आणणे, जनतेमध्ये विश्वास निर्माण करणे त्यांना संरक्षणाची हमी देणे, या सर्व गोष्टींचे मोठे आव्हान लॉकडाऊन संपल्यानंतर भारतापुढे उभे झाले आहे.

**निष्कर्ष –**

कोरोणा महामारीमुळे संपूर्ण विश्व भयभीत झाले आहे. या भीतग्रस्त परिस्थितीत जीवन जगतांना लोकांना अनेक आव्हानांना स्वीकारावे लागणार आहे. कोरोणामुळे झालेले सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि व्यावहारिक बदल अंगीकारल्याशिवाय व्यक्ती अथवा राष्ट्र आपली वाटचाल अथवा प्रगती करू शकणार नाही. याकरिता आवश्यकता आहे ती आत्मनिर्भर होण्याची आणि कोराणामुळे जी नवीन संस्कृती उदयाला आली त्या संस्कृतीतील नियमांचे पालन करून स्वतला सुरक्षित ठेवण्याचे फार मोठे सामाजिक आव्हान मानव जातीवर येऊन ठेवले आहे. या नीतिनियमाचे पालन करून तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने या आव्हानांचा सामना करू शकू.

**संदर्भ –**

www.india.gov.in
Ministry of Health & Family Welfare
Indian Journal of Medical Research
दैनिक लोकसत्ता